शनिवार दि. ०४ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३०३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ | 8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

जीवनदाता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

# भटक्या कुत्र्यांनी दोन बालकांचा बळी घेऊनही महानगरपालिका आणि सरकार गप्प कसे?

## आ. अर्जुनराव खोतकर यांनी सरकारला धारेवर धरले

**जालना – प्रतिनिधी**

भटक्या कुत्र्यांनी जालना शहरातील दोन बालकांचा लचके तोडून जीव घेतला आहे. याशिवाय एका पोलीस कर्मचाऱ्याचाही चावा घेतल्याने मृत्यू झाला आहे. केवळ पंधरा दिवसात ९३ लोकांवर कुत्र्यांनी हल्ला केला आहे. अशा गंभीर घटना होऊ नये म्हणून महानगरपालिका आणि सरकार काय करत आहे, असा संतप्त सवाल आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित करून सरकारला धारेवर धरले. दरम्यान, आमदार खोतकर यांचा आक्रमक पवित्रा लक्षात घेत मंत्री उदय सामंत यांनी महानगरपालिकेवर कारवाई केली जाईल, श्वानांचा बंदोबस्त आणि संबंधित कुटुंबाला आर्थिक मदत मिळवून दिली जाईल अशी ग्वाही दिली.

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, लहान मुले आणि नागरिकांचा अशा पद्धतीने नाहक बळी जाऊ नये म्हणून सर्वोच्च न्यायालयाने स्वतः दखल घेतलेली आहे. खुद्द न्यायालय दखल घेत असताना महानगरपालिका आणि सरकार दिरंगाई का करीत आहे? माझ्या जालना शहरात अर्जुननगर येथील श्रद्धा पाटोळे (वय ७), यशवंतनगर येथील परी गोसावी (वय ३) या बालकांचा भटक्या कुत्र्यांनी अक्षरशः लचके तोडत जीव घेतला आहे. व चंदनझिरा येथील गौरव खरात ( ४)यास हल्ला करून जख्मी केले याशिवाय भोकरदन येथील एक पोलीस कर्मचारी किशोर मोरे हा देखील कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडला आहे. केवळ पंधरा दिवसातच जालन्यात ९३ नागरिकांवर कुत्र्यांनी हल्ला करून जखमी केले आहे. गुंड टोळ्यांच्या दहशतीखाली वावरणारे जालन्यातील नागरिक आता कुत्र्यांच्या टोळ्यांच्याही प्रचंड दहशतीखाली आहेत. इतकी गंभीर स्थिती असताना महानगरपालिका आणि सरकारने काय कारवाई केली आहे? श्वानांचे निर्बीजीकरण, निवारा आणि अँटी रेबीज लसीकरण महानगरपालिकेकडून का केले जात नाही? याबाबत पंचवीस सामाजिक संघटनांनी निवेदन देऊनही उपयोग झालेला नाही. भटक्या श्वानांचा वार्डनिहाय बंदोबस्त करण्यात यावा, निर्बीजीकरण, लसीकरण करण्यात यावे. श्वानांच्या बंदोबस्तासाठी नगरपालिका / महानगरपालिकांना निधी देण्यात यावा. तसेच कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पीडितांच्या कुटुंबांना आर्थिक सहाय्य दिले जावे अशी आक्रमक मागणी केली.



**मंत्र्यांकडून दखल**

**आमदार खोतकर यांनी केलेल्या आक्रमक मागणीची मंत्री उदय सामंत यांनी दखल घेतली. ते म्हणाले की, अर्जुनराव खोतकर यांनी वस्तुस्थिती सांगितली आहे. संबंधित महानगरपालिकेला निर्देश दिले जाईल तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पीडितांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतही दिली जाईल. श्वानांच्या बंदोबस्तासाठी नियमानुसार आवश्यक तो निधीही दिला जाईल, असे सांगितले.तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार नगरपालिका, महानगरपालिकांनी श्वानांचा बंदोबस्त करावा,असे सुचित केले. हा प्रश्न जालन्यासह संपूर्ण महाराष्ट्राचा आहे. राज्यात सुमारे १४ लाख ८० हजार भटके श्वान आहेत. त्यापैकी मागील वर्षी तीन लाखांवर श्वानांचे निर्बीजीकरण आणि चार लाखांवर श्वानांचे लसीकरण करण्यात आले आहे. चालू वर्षातही ६५ हजार ३८५ श्वानांचे निर्बीजीकरण आणि ९७ हजार ९५९ श्वानांचे लसीकरण करण्यात आले आहे, अशी माहिती दिली.**

---

# परतूरमधील पाकिस्तानी गाणे प्रकरणाला नवे वळण; किरीट सोमयांची शाळेला भेट, ‘मान्यता नाही, इमारतीवरही कारवाई होणार’

**परतूर । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील परतूर येथील किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांकडून कथितपणे पाकिस्तानी गाण्यावर आधारित कार्यक्रम सादर करण्यात आल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर निर्माण झालेल्या वादाला आता नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर भाजप नेते किरीट सोमय्या यांनी शुक्रवारी संबंधित शाळेला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शाळेच्या मान्यता, जागेची वैधता आणि प्रशासनाच्या भूमिकेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत कठोर कारवाईची मागणी केली. यापूर्वी व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत संस्थाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे. या दरम्यान किरीट सोमय्या यांनी शाळेची पाहणी करून पत्रकारांशी संवाद साधताना संबंधित शाळा शिक्षण विभागाच्या आवश्यक मान्यतेशिवाय सुरू असल्याचा आरोप केला.

सोमय्या यांनी दावा केला की, शाळेला अधिकृत परवानगी नसून ती नियमबाह्य पद्धतीने सुरू आहे. तसेच शाळेची इमारत इनामी जमिनीवर उभारण्यात आल्याचाही आरोप त्यांनी *(पान २ वर)*

## संपूर्ण संचालक मंडळावर कठोर कारवाई होणार– किरीट सोमय्या

भाजपाचे ज्येष्ठ नेते किरीट सोमय्या यांनी परतूर दौऱ्यादरम्यान किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलला भेट देऊन काही दिवसांपूर्वी शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांकडून पाकिस्तानी गाण्यावर सादर करण्यात आलेल्या नृत्यप्रकरणाची प्रत्यक्ष पाहणी केली. या घटनेने राज्यभर तीव्र संताप व्यक्त झाला होता. देशभक्तीच्या भावना दुखावणाऱ्या या प्रकाराची गंभीर दखल घेत सोमय्या यांनी संबंधित प्रकरणाची माहिती घेतली तसेच शाळा परिसराची पाहणी करून संबंधितांशी चर्चा केली.

यावेळी माध्यमांशी संवाद साधताना किरीट सोमय्या म्हणाले की, ‘‘देशविघातक मानसिकतेला प्रोत्साहन देणाऱ्या कोणत्याही प्रकाराला भारतीय जनता पक्ष कधीही खपवून घेणार नाही. शैक्षणिक संस्था या विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, संविधानिक मूल्ये आणि भारतीय संस्कृतीची जपणूक करणाऱ्या असल्या पाहिजेत. मात्र, स्नेहसंमेलनासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमात पाकिस्तानी गाण्यावर नृत्य सादर होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. या प्रकरणातील दोषींना कोणतीही माफी दिली जाणार नाही. चौकशीत जे कोणी दोषी आढळतील




त्यांच्यावर कठोर कारवाई होईल. आवश्यक असल्यास संपूर्ण संचालक मंडळालाही जेलमध्ये जावे लागेल.‘‘

काही दिवसांपूर्वी किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी पाकिस्तानी गाण्यावर नृत्य सादर केल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. त्यानंतर माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी, याप्रकरणी विधानसभेत आवाज उठवला होता तसेच विविध सामाजिक संघटना, पालक, नागरिक आणि भाजप पदाधिकाऱ्यांनी या प्रकाराचा निषेध करत संबंधितांवर कारवाईची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर किरीट सोमय्या यांनी प्रत्यक्ष शाळेत जाऊन पाहणी केली आणि संपूर्ण घटनेचा आढावा घेतला.

यावेळी त्यांनी राज्यभर सुरू असलेल्या मतदार यादी शुद्धीकरण (एसआयआर) मोहिमेबाबतही सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, ‘‘मतदार यादी शुद्ध करण्यासाठी सुरू असलेल्या एसआयआर मोहिमेमुळे राज्यातील सुमारे ५० लाख घुसखोरांची नावे मतदार यादीतून वगळली जाणार आहेत. लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदार यादी अचूक, पारदर्शक आणि कायदेशीर असणे अत्यंत आवश्यक आहे. या मोहिमेत प्रत्येक कार्यकर्त्याने सक्रिय सहभाग नोंदवून लोकशाही प्रक्रियेला बळ द्यावे.‘‘

भाजप कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सोमय्या यांनी सांगितले की, माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी बूथनिहाय आखून दिलेल्या नियोजनानुसार *(पान २ वर)*

# जालन्यात प्रथमच रंगणार श्री संत मुक्ताई पालखीचा ऐतिहासिक रिंगण सोहळा

### जय्यत तयारी पूर्ण, प्रशासन सज्ज– विजय महाराज फुलंब्रीकर



**जालना । प्रतिनिधी**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर श्री संत मुक्ताई पालखी सोहळा जालन्यातून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करणार असून, यंदा प्रथमच जालना शहरात ऐतिहासिक रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तब्बल अनेक वर्षांच्या परंपरेत प्रथमच होत असलेल्या या सोहळ्यामुळे वारकरी संप्रदायात मोठा उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासन आणि जालना महानगरपालिकेने या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी जय्यत तयारी पूर्ण केली आहे. रविवारी जालना येथील जे.ई.एस. महाविद्यालयाच्या विस्तीर्ण मैदानावर हा भव्य रिंगण सोहळा पार पडणार आहे. हजारो वारकरी, भाविक आणि नागरिक या सोहळ्याला उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने नियोजनबद्ध तयारी केली आहे.

या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, जालना महानगरपालिकेचे उपायुक्त कांबळे तसेच सहाय्यक आयुक्त विजय महाराज फुलंब्रीकर यांनी कार्यक्रमस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन सर्व सुविधांची पाहणी केली. विविध विभागांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून आवश्यक सूचनाही देण्यात आल्या.

यावेळी सहाय्यक आयुक्त विजय महाराज फुलंब्रीकर यांनी सांगितले की, वारकरी व भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी महानगरपालिकेच्या वतीने सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून *(पान २ वर)*

---

# आषाढी वारी व आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या शिष्टमंडळाने घेतली पोलीस अधीक्षकांची भेट



**जालना – प्रतिनिधी**

आषाढी वारी तसेच आगामी गणेशोत्सवासारख्या सण–उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी करत शिवसेनेच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू यांची भेट घेतली. शिवसेना संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्यासह माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. गेल्या दोन महिन्यांपूर्वी जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक म्हणून रुजू झाल्यानंतर तेघबीरसिंग संधू यांनी कर्तव्यदक्ष व संवेदनशील कार्यपद्धतीच्या माध्यमातून जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था सुधारण्यासाठी तसेच वाढत्या अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी प्रभावी

पावले उचलली आहेत. विशेषतः जालना शहरातील वाहतूक कोंडीची समस्या कमी कालावधीत सुरळीत केल्याने नागरिकांमध्ये त्यांच्या कामकाजाबाबत सकारात्मक भावना निर्माण झाली आहे. शिष्टमंडळाने आषाढी वारीनिमित्त जिल्ह्यातून जाणाऱ्या दिंड्यांच्या सुरक्षिततेसाठी विशेष नियोजन करण्याची मागणी केली. काही वर्षांपूर्वी पायी वारी करणाऱ्या यात्रेकरूंच्या दिंडीचा अपघात झाल्याची आठवण करून देत

भविष्यात अशा दुर्दैवी घटना घडू नयेत, यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची विनंती करण्यात आली. यावेळी आगामी गणेशोत्सव, वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा नियोजन आणि जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था यासंदर्भात शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

# इलेक्ट्रिक बसमुळे विद्यार्थी, नोकरदार अडचणीत; टेंभुर्णीकरांचा जाफ्राबाद डेपोच्या कारभाराविरोधात संताप सकाळच्या सर्व फेऱ्या इलेक्ट्रिक बसच्या

### पासधारकांना प्रवेश नाही, भाडेवाढीचा फटका – रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद आगाराच्या बससेवेत करण्यात आलेल्या बदलामुळे टेंभुर्णी परिसरातील विद्यार्थी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक आणि नियमित प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सकाळच्या गर्दीच्या वेळेत (५.३० ते ९.००) बहुतांश फेऱ्या इलेक्ट्रिक बसच्या करण्यात आल्याने मासिक पासधारकांना प्रवास करता येत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या शेकडो प्रवाशांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत असून, परिस्थिती कायम राहिल्यास रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पूर्वी टेंभुर्णीहून जालन्याकडे सकाळी ५.३०, ६.३०, ७.००, ७.३० आणि ८.०० वाजता नियमित लालपरी (एसटी) बस उपलब्ध होत होत्या. या बसमध्ये विद्यार्थी सवलत, मासिक पास आणि ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभमिळत होता. मात्र, इलेक्ट्रिक बस सेवा सुरू झाल्यानंतर सकाळच्या बहुतांश फेऱ्या इलेक्ट्रिक बसच्या करण्यात आल्या असून, केवळ सुमारे सव्वासातच्या



सुमारास एकच लालपरी बस उपलब्ध असल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. नागरिकांचा आरोप आहे की, संबंधित इलेक्ट्रिक बस शिवाई प्रकारात मोडत असल्यामुळे या बसमध्ये विद्यार्थी पास, मासिक पास किंवा ज्येष्ठ नागरिकांचे पास स्वीकारले जात नाहीत. परिणामी, पास असूनही प्रवाशांना रोख रक्कम भरून तिकीट काढावे लागत आहे. यामुळे शासनाच्या सवलतींचा प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याची भावना व्यक्त होत आहे. भाड्यातील फरकामुळे आर्थिक ताण वाढल्याचाही मुद्दा नागरिकांनी उपस्थित केला आहे. पूर्वी टेंभुर्णी ते जालना या मार्गावरील लालपरी बसचे भाडे सुमारे ५० रुपये होते, तर इलेक्ट्रिक बससाठी ८० रुपये मोजावे लागत असल्याचा त्यांचा दावा आहे. त्यामुळे रोज अप डाऊन करणाऱ्या विद्यार्थी आणि नोकरदारांचा मासिक खर्च लक्षणीय वाढला आहे. एका पालकाने नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर सांगितले की, ‘‘माझी दोन मुले जालन्यात शिक्षण घेत आहेत. दोघांचेही मासिक पास काढले आहेत. मात्र सकाळी लालपरी बस उपलब्ध नसल्याने

इलेक्ट्रिक बसने प्रवास करावा लागतो. पास चालत नसल्यामुळे रोज अतिरिक्त खर्च करावा लागतो. हा खर्च सामान्य कुटुंबासाठी परवडणारा नाही. जालन्यात नोकरीसाठी नियमित प्रवास करणारे सुनील पाटील म्हणाले, ‘‘आम्ही मासिक पास

घेतला आहे. पण सकाळच्या वेळेत त्याचा उपयोगच होत नाही. पास असूनही पुन्हा तिकीट काढावे लागते. ही व्यवस्था प्रवाशांवर अन्याय करणारी आहे. नागरिकांनी जाफ्राबाद आगार प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी केल्याचा दावा केला असून, समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची खंत व्यक्त केली आहे. सकाळच्या गर्दीच्या वेळेत किमान काही लालपरी बस सुरू ठेवाव्यात,

इलेक्ट्रिक बसमध्येही पासधारकांना प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी किंवा पर्यायी व्यवस्था करावी, अशी त्यांची मागणी आहे. शिवाजीनगर बसथांब्यावर वाहतूक कॉडी

टेंभुर्णीतील शिवाजीनगर परिसरात बस थांबविण्याच्या पद्धतीमुळे वाहतूक कोंडी होत असल्याचाही मुद्दा नागरिकांनी उपस्थित केला आहे. एकाच ठिकाणी तीन–चार एसटी बस, खाजगी वाहने आणि मोठ्या संख्येने दुचाकी उभ्या राहत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे अपघाताचा धोका वाढत असून, या ठिकाणी वाहतूक नियोजन करण्याची मागणी करण्यात आली आहे.

टेंभुर्णीस स्वतंत्र बसस्थानकाची मागणी

टेंभुर्णी येथे अद्याप स्वतंत्र आणि सुसज्ज बसस्थानक नसल्यामुळे प्रवाशांना विशेषतः रात्री मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याचे व्यापारी महासंघाने म्हटले आहे. *(पान २ वर)*

# संपादकीय....

## करदात्यांचा सन्मान ही आर्थिक संस्कृतीची जपणूक

देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत ठेवणारा सर्वात महत्त्वाचा घटक कोणता, असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर एकच आहेकर महसूल. शासनाच्या तिजोरीत जमा होणारा प्रत्येक रुपया हा देशाच्या विकासाचा पाया रचत असतो. रस्ते, पूल, रेल्वे, सिंचन प्रकल्प, आरोग्य सुविधा, शिक्षण, संरक्षण, ग्रामीण विकास, उद्योगांना प्रोत्साहन, सामाजिक सुरक्षा योजना आणि गरिबांच्या कल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या असंख्य योजनांचा आर्थिक आधार हा कर महसूलच असतो.

अशा परिस्थितीत नियमितपणे आणि प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या उद्योगांचा सार्वजनिक गौरव करणे ही केवळ औपचारिकता नसून एक सकारात्मक आर्थिक संस्कृती निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. केंद्रीय वस्तू व सेवा कर () विभागाने मराठवाड्यातील अग्रणी करदाता म्हणून कालिका स्टील अलॉयज प्रा. लि.चा केलेला सन्मान हा त्याच दृष्टीने महत्त्वाचा मानावा लागेल. भारतात दीर्घकाळ कर भरण्यापेक्षा कर टाळण्याच्या मानसिकतेची चर्चा होत आली आहे. करचुकवेगिरी, बनावट बिले, काळा पैसा आणि रोख व्यवहार यामुळे शासनाचा मोठा महसूल बुडत असे. वस्तू व सेवा कर () लागू झाल्यानंतर डिजिटल व्यवहार, ई-इनव्हॉइस, ई-वे बिल आणि ऑनलाइन रिटर्न यामुळे करप्रणाली अधिक पारदर्शक झाली. आज उद्योगांना केवळ नफा कमावणे पुरेसे नाही, तर कायद्याचे पालन करत प्रामाणिक करदाते म्हणून जबाबदारी पार पाडणेही तितकेच आवश्यक झाले आहे. उद्योगांकडून भरला जाणारा कर हा केवळ सरकारचा महसूल नसतो; तो समाजाच्या विकासात उद्योगक्षेत्राने दिलेले थेट योगदान असते. एखादा उद्योग जितका मोठा कर भरतो, तितक्या प्रमाणात तो रोजगारनिर्मिती, उत्पादनवाढ आणि आर्थिक व्यवहारांना चालना देत असल्याचेही त्यातून दिसून येते. त्यामुळे मोठ्या करदात्यांचा गौरव म्हणजे उद्योगविश्वातील पारदर्शकता, शिस्त आणि उत्तरदायित्वाचा गौरव होय. मात्र, या चित्राची दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. करदात्यांनी प्रामाणिकपणे कर भरावा, अशी अपेक्षा जशी शासनाची असते, तशीच करातून जमा झालेल्या निधीचा पारदर्शक, कार्यक्षम आणि लोकहिताचा वापर करण्याची जबाबदारी शासनावरही असते. करदात्यांना दर्जेदार पायाभूत सुविधा, चांगल्या आरोग्य सेवा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, सुरक्षितता आणि सुलभ प्रशासन मिळाले, तर करप्रणालीवरील विश्वास अधिक दृढ होतो. आज भारत पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. ही वाटचाल केवळ सरकारी धोरणांवर अवलंबून नसून उद्योग, व्यापारी, उद्योजक आणि सामान्य करदाते यांच्या प्रामाणिक सहभागावरही अवलंबून आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ :कर्जमुक्ती योजनेचा व्यापक परीणाम

महाराष्ट्र राज्यातील शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. राज्यातील मोठ्या लोकसंख्येची उपजीविका शेती व संबंधित व्यवसायांवर अवलंबून आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत अनियमित पर्जन्य, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट तसेच हवामान बदलाचे वाढते परिणाम यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. उत्पादन खर्चात वाढ, बाजारभावातील अनिश्चितता आणि नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होत असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध करून देत शेती क्षेत्राला बळकटी देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'' जाहीर केली आहे. ही योजना राज्याच्या इतिहासातील सर्वात व्यापक कर्जमुक्ती उपक्रम मानली जात असून सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देण्याचे उद्दिष्ट आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख व दूरदृष्टीच्या शासक होत्या. त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त या योजनेला त्यांचे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्यास अभिवादन केले आहे. राज्य शासनाने यापूर्वीही शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध कर्जमुक्ती योजना राबवल्या आहेत. यामध्ये २०१७ मधील छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना तसेच २०१९ मधील महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना यांचा समावेश आहे. या योजनांमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असला तरी कर्जाचे दुष्टचक्र पूर्णपणे थांबलेले नाही. या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञ समिती नेमण्यात आली होती. समितीच्या शिफारशींनुसार तातडीचा उपाय म्हणून ही नवी कर्जमुक्ती योजना लागू करण्यात आली आहे.

**योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये :**

या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना मुद्दल व व्याजासह प्रति शेतकरी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती देण्यात येणार आहे. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचा समावेश करण्यात आला असून ३० सप्टेंबर २०२५पर्यंत थकीत व ३१ मार्च २०२६ पर्यंत न फेडलेल्या कर्जांना ही योजना लागू आहे.

यामध्ये एक महत्त्वाचा सकारात्मक बदल करण्यात आला आहे. पूर्वी कर्जाची रक्कम दोन लाख रुपयांपेक्षा किंचित जास्त असल्यास शेतकरी अपात्र ठरत होते. मात्र, आता अशा शेतकऱ्यांना दोन लाखांवरील रक्कम स्वतः भरल्यानंतर उर्वरित दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती शासनामार्फत दिली जाणार आहे. यामुळे अधिकाधिक शेतकरी या योजनेच्या कक्षेत येणार आहेत.

**एकवेळ समझोता योजना () :**

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांनी अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर त्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. या तरतुदीमुळे मोठ्या थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनाही दिलासा मिळणार आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्यांसाठी प्रोत्साहन :**

कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी शासनाने विशेष प्रोत्साहनपर लाभाची तरतूद केली आहे. नियमानुसार कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन दिले जाणार आहे. यामुळे प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन मिळून बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होणार आहे.

पारदर्शक व ऑनलाईन अंमलबजावणी :

या योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असून आधार प्रमाणीकरण अनिवार्य करण्यात आले आहे. राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण तसेच सहकारी बँकांमधील कर्जांचा यामध्ये समावेश आहे. पारदर्शकता आणि अचूकता सुनिश्चित करण्यासाठी डिजिटल प्रणालीचा वापर करण्यात येत आहे.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना :**

या योजनेद्वारे सुमारे ३६ हजार कोटी रुपयांहून अधिक निधी वितरित होणार आहे. कर्जमुक्तीमुळे शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण कमी होऊन त्यांना नव्याने शेतीत गुंतवणूक करण्याची संधी मिळेल. परिणामी उत्पादनवाढ, रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण बाजारपेठेला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

**दीर्घकालीन उपायांची गरज :**

कर्जमुक्ती ही तात्पुरती दिलासादायक उपाययोजना असली तरी शाश्वत कृषी विकासासाठी सिंचन सुविधा, पीकविमा, साठवणूक व्यवस्था, बाजारपेठेपर्यंत थेट प्रवेश, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि हमीभाव यांसारख्या घटकांवर भर देणे आवश्यक आहे. राज्य शासनाने कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही केवळ कर्जमाफी नसून शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा एक व्यापक प्रयत्न आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळेल. तथापि, शाश्वत विकासासाठी सर्वसमावेशक कृषी धोरणांची प्रभावी अंमलबजावणी हाच पुढील काळातील खरा मार्ग ठरणार आहे. शेतकरी सक्षम झाला तरच राज्य आणि देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल.

**परमेश्वर वरखडे)**
**जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था जालना**

## जिकडे झाडे, तिकडे पाऊस

एकेकाळी पृथ्वीतलावर झाडांची अमाप संख्या होती. जिकडे बघावे तिकडे नुसती झाडेच झाडे दिसायची. शेत शिवारात फेरफटका मारायला एकट्याने जायचे म्हटल्यावर कोणाचीच हिंमत होत नसे. पूर्ण शेत शिवार झाडांमध्ये लपलेला आणि हिरवळीने नटलेला दिसायचा. निसर्गाचे लाजवाब सृष्टी सौंदर्य पाहून प्रत्येकाचे मन आनंदाने तृप्त होऊन गाणे गायचे. कारण तेव्हा झाडांची एवढी प्रचंड गर्दी पृथ्वीवर आपल्याला पाहायला मिळायची. म्हणून त्याकाळी पाऊस वेळेवर पडायचा आणि वेळेवरच बंद व्हायचा. म्हणजे शेतातील पिकांना पुरेसा पाऊस पडायचा. आताच्या सारखी ना अतिवृष्टी व्हायची, ना कोरडा दुष्काळ पडायचा. शेतातील हिरवळीने नटलेली पिके आनंदाने थुई थुई नाचायची. जोमाने शेतात आलेली पिके पाहून सगळे शेतकरी आनंदाने सुखावून जायचे. प्रत्येक पीक त्या त्या ऋतूमध्ये काढले जायचे. धरणीमाय सुद्धा काढणीला शेतकऱ्यांना भरपूर बरकत द्यायची. म्हणून सगळे शेतकरी बांधव आनंदात असायचे. गुण्यागोविंदाने आपला घर प्रपंच चालवायचे. त्याकाळी शेतकऱ्यांवर कधीच वाईट दिवस आले नाहीत. शेतकरी आत्महत्येचे प्रमाण त्याकाळी शून्य होते. सांगायचा मुद्दा असा की, त्याकाळी सगळीकडे झाडेच झाडे असायची म्हणून पाऊसही दमदार पडायचा आणि सगळा शेत शिवार ओलाचिंब करून टाकायचा. नद्या, नाले, ओढे, तलाव आणि विहिरी ओसंडून वाहायच्या. तेव्हाचा पाऊस कहरही करत नव्हता आणि पिकांना अपुराही पडत नव्हता. म्हणजे शेतीला पुरेसा पाऊस पडायचा. म्हणून शेती सुद्धा उत्तम पिकायची आणि धनधान्याने शेतकऱ्यांची ओटी भरायची. परंतु आता शेतकऱ्यांवर अतिशय वाईट दिवस आले आहेत. शेतकऱ्यांच्या नशिबात एक तर ओला दुष्काळ आहे, नाहीतर कोरडा दुष्काळ आहे. पाऊस नाही पडला तरीही पिकांचे नुकसान आणि पाऊस पडला तरीही पिकांचे नुकसान. सांगायची बाब अशी की, अतिवृष्टी आणि दुष्काळ या दोन्हींच्या कचाट्यात आज बळीराजा अडकला आहे.

## १२ वर्षांपासून रखडलेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या तपासाची उच्चस्तरीय चौकशीची मागणी करणार - आ. खोतकर

### अर्पण गोयल यांचे आझाद मैदानावर लाक्षणिक उपोषण

**जालना - प्रतिनिधी**

दैनिक गोकुळनितीचे संपादक अर्पण कमलकिशोर गोयल यांनी २३ डिसेंबर २०१४ रोजी स्वतःवर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या प्रकरणाचा तपास गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचा आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तसेच विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. सरकारचे लक्ष वेधण्यासाठी २ जुलै रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे लाक्षणिक उपोषणाचे आंदोलन करून इशाराही त्यांनी दिला यावेळी आमदार अर्जुन खोतकर यांच्या आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले. अर्पण गोयल यांनी दिलेल्या निवेदनानुसार, २३ डिसेंबर २०१४ रोजी जालना येथे त्यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. या घटनेनंतर जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३०४/२०१४ दाखल करण्यात आला असून आरोपींविरुद्ध गंभीर स्वरूपाची कलमे लावण्यात आली होती. मात्र, जवळपास बारा वर्षांचा कालावधी उलटूनही या प्रकरणाचा तपास पूर्ण झालेला नाही. आरोपींचा शोध लागलेला नसून त्यांना अटकही करण्यात आलेली नाही. त्यामुळे या तपासाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली मात्र, न्यायालयात पोलिसांनी एक शपथपत्र दाखल केल्या या तपासाला एका स्पेशल टीम निर्माण केला आहे असे शपथपत्र दाखल केला आहे पथकात कोणत्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली, त्यांनी आतापर्यंत कोणती कारवाई केली आणि तपासाची सद्यस्थिती काय आहे, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती देण्यात आलेली नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. गोयल यांनी म्हटले आहे की, या प्रकरणात तपास अधिकाऱ्यांकडून गंभीर निष्काळजीपणा झाला असून त्यामुळे आरोपींना अभय मिळाले आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करून त्यांच्यावरही योग्य ती प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

याशिवाय प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया दिल्ली समितीसमोर ही हे प्रकरण मांडण्यात आले होते. समितीने पोलिसांकडून अहवाल मागविला होता. मात्र, पोलिसांनी समितीला योग्य व वस्तुनिष्ठ माहिती दिली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व उच्चस्तरीय चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. निवेदनात तत्कालीन पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांनी न्यायालयात सादर केलेल्या अहवालाचाही उल्लेख करण्यात आला आहे. या अहवालात आरोपींचा शोध सुरू असल्याचे नमूद करण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात तपासात कोणतीही ठोस प्रगती झालेली नसल्याचा दावा गोयल यांनी केला आहे. दरम्यान, या प्रकरणात वारंवार शासन, पोलीस प्रशासन आणि संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा करूनही न्याय मिळाला नसल्याने आता लोकप्रतिनिधींनी हस्तक्षेप करावा, यामागणी साठी गोयल यांनी उपोषणाचे हत्यार उपसले असून त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार अर्जुन खोतकर व आमदार अंबादास दानवे यांच्याकडे दाद मागत विधानसभा आणि विधान परिषदेत हा विषय उपस्थित करून शासनाकडून निष्पक्ष तपासाची मागणी करावी, अशी विनंतीही त्यांनी केली आहे. न्यायासाठीचा लढा अधिक तीव्र करत २ जुलै २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे उपोषण आंदोलन करण्यात आले.

## पान १ व ४ वरुन...

### परतूरमधील पाकिस्तानी...

केला. त्यामुळे संबंधित सर्व बाबींची चौकशी करून नियमांचे उल्लंघन झाल्याचे सिद्ध झाल्यास शाळेला सील करण्यात यावे आणि आवश्यक असल्यास इमारतीवरही कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

या भेटीदरम्यान त्यांनी प्रशासनाने या प्रकरणात कोणतीही दिरंगाई न करता शिक्षण विभाग, महसूल विभाग आणि स्थानिक प्रशासनाने संयुक्तपणे चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, असेही सांगितले. दरम्यान, पाकिस्तानी गाण्यावर विद्यार्थ्यांचा कार्यक्रम झाल्याच्या व्हिडिओमुळे आधीच राज्यभरात या घटनेची चर्चा सुरू असताना आता शाळेच्या मान्यतेचा मुद्दा आणि जागेच्या वैधतेचा प्रश्न समोर आल्याने हे प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे. त्यामुळे शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या संपूर्ण घडामोडींमुळे परतूर शहरात मोठी खळबळ उडाली असून पालक, नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांचे लक्ष आता प्रशासनाच्या पुढील कारवाईकडे लागले आहे. संबंधित शाळेची मान्यता, इमारतीची कायदेशीर स्थिती आणि इतर आरोपांची पडताळणी करून प्रशासन कोणता निर्णय घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. प्रशासनाकडून अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट नाही ''या संदर्भात शिक्षण विभाग किंवा महसूल प्रशासनाकडून शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत अथवा इमारतीवर कारवाई करण्याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. किरीट सोमय्या यांनी केलेले दावे आणि आरोप यांची पडताळणी संबंधित यंत्रणांकडून सुरू असून, अधिकृत चौकशी अहवालानंतरच पुढील कारवाईबाबत स्पष्टता येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणातील आरोप आणि प्रशासनाचा अंतिम निष्कर्ष यामध्ये फरक असू शकतो.

### संपूर्ण संचालक...

प्रत्येक बीएलए-२ने अत्यंत जबाबदारीने काम करावे. मतदार यादीतील प्रत्येक नावाची तपासणी करून नियमांनुसार आवश्यक त्या सूचना आणि आक्षेप नोंदविण्याचे काम प्रभावीपणे पार पाडावे.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राहुल लोणीकर यांनीही बीएलए-२ कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, ''एसआयआर मोहिमेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रत्येक बीएलए-२ने आपल्या बूथवर सुरू असलेल्या कामावर सातत्याने लक्ष ठेवावे. मतदार यादी पुनरावलोकनाचे काम योग्य पद्धतीने होत आहे की नाही याची खात्री करून ज्या ठिकाणी चुकीची नावे, अपात्र नोंदी किंवा अन्य त्रुटी आढळतील, त्या ठिकाणी तात्काळ कायदेशीर पद्धतीने आक्षेप नोंदवावेत. बूथ मजबूत करण्यासाठी आणि मतदार यादी शुद्ध करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करावे.''

दौऱ्यादरम्यान किरीट सोमय्या यांनी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांशी संवाद साधून संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेतला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बूथस्तरावरील संघटन अधिक मजबूत करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राहुल लोणीकर, संदीप भैया गोरे, गणेश राव खवणे भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघन कणसे, मंठा तालुका अध्यक्ष नितीन राठोड, विक्रम उफाड, बी एल ए वन सतीश निर्वळ पंजाबराव बोराडे भाजपा जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले भाजपा शहराध्यक्ष प्रवीण सातोणकर, जिजाबाई जाधव, नगरसेवक संदीप बाहेकर संभाजी वारे गटनेते प्रकाश चव्हाण, सावता काळे, शहाजी राक्षे कृष्ण आरगडे सोनू अग्रवाल नितीन सरकटे शरद पाटील माऊली तनपुरे सनी तनपुरे पद्माकर कवडे, राजेंद्र वायाळ परमेश्वरा कात भगवान आरडे अमोल जोशी रमेश थोरात, छत्रपती थोरात आसिफ कच्ची मुजीब भाई, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष संभाजी घनवट भाजपचे पदाधिकारी, बीएलए-२, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### जालन्यात प्रथमच...

देण्यात आल्या आहेत. पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था, पुरेशी स्वच्छतागृहे, परिसराची स्वच्छता, नाश्त्याची सोय, कचरा व्यवस्थापन, प्रकाश व्यवस्था तसेच इतर मूलभूत सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत.

याशिवाय आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन वैद्यकीय पथक, रुग्णवाहिका, अग्निशमन दल, पोलीस बंदोबस्त आणि वाहतूक नियोजनाचीही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. रिंगण सोहळ्यादरम्यान भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्याने सुरक्षा आणि शिस्त राखण्यासाठी विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यात आला आहे.

प्रथमच जालना शहरात होत असलेल्या या ऐतिहासिक रिंगण सोहळ्यामुळे शहराच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभवात भर पडणार असल्याची भावना वारकरी संप्रदायातून व्यक्त होत आहे. संत मुक्ताईंच्या पालखीचे दर्शन आणि रिंगण सोहळ्याचा अनुभव घेण्यासाठी जिल्ह्यासह मराठवाड्यातील विविध भागांतून हजारो भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

प्रशासनाने नागरिकांना सहकार्य करण्याचे, वाहतूक नियमांचे पालन करण्याचे तसेच शिस्तबद्ध पद्धतीने सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. सर्व विभागांच्या समन्वयातून हा ऐतिहासिक रिंगण सोहळा भक्तिमय, उत्साहपूर्ण आणि निर्विघ्न वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असल्याचे सहाय्यक आयुक्त विजय महाराज फुलंब्रीकर यांनी सांगितले.

### इलेक्ट्रिक बसमुळे विद्यार्थी...

या मागणीसाठी अनेक आंदोलने करूनही लोकप्रतिनिधींकडून अपेक्षित पाठपुरावा होत नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली.

व्यापारी महासंघाचे अध्यक्ष अलकेश सोमाणी म्हणाले, ''टेंभुर्णीसाठी स्वतंत्र बसस्थानक ही अनेक वर्षांची मागणी आहे. गावाच्या वाढत्या लोकसंख्येनुसार ही गरज अत्यावश्यक झाली आहे. शासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे.''

नागरिकांनी जाफ्राबाद आगार प्रशासन, राज्य परिवहन महामंडळ आणि संबंधित लोकप्रतिनिधींनी या समस्येची तातडीने दखल घेऊन सकाळच्या वेळेत लालपरी बसच्या फेऱ्या वाढवाव्यात, पासधारकांना दिलासा द्यावा आणि वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करावी, अशी मागणी केली आहे. तसेच मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

### विकसित भारत...

मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारीया यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमास विभागीय वन अधिकारी श्री. वडोदे, जिल्हा रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते, प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) तथा गटविकास अधिकारी संदीप पवार, प्रभारी तहसीलदार प्रणाली तायडे, तालुका कृषी अधिकारी विष्णू राठोड, नायब तहसीलदार (रोहयो) डॉ. नीलम लुणावत, गटविकास अधिकारी (नरेगा) पदमा मॅडम, कार्यक्रम व्यवस्थापक श्री. सतीश देवढे यांच्यासह जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकारी, तांत्रिक सहाय्यक, संगणक परिचालक, महिला बचत गटांच्या सदस्य, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स, ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने रोजगार हमीवरील मजूर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामविकास अधिकारी श्री. प्रविण पवार आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सोपान मोहिते यांनी विशेष परिश्रम घेतले.

### दिव्यांगांच्या सेवेसाठी...

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते पुनर्वसन केंद्राच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी त्यांनी केंद्राची पाहणी करून दिव्यांगांसाठी उपलब्ध सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे सांगितले.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या, ''दिव्यांग पुनर्वसन केंद्राचा टप्प्याटप्प्याने विस्तार करण्यात येईल. केंद्रासमोर दिव्यांगांसाठी सुसज्ज व आकर्षक उद्यान विकसित करण्यात येणार आहे. रेल्वे स्थानक आणि बसस्थानकाच्या मध्यवर्ती ठिकाणी हे केंद्र असल्याने जिल्हाभरातून येणाऱ्या दिव्यांगांना याचा मोठा लाभ होईल. दिव्यांगांना अधिक दर्जेदार व सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे कटिबद्ध आहे.''

या उपक्रमामुळे अनेक दिव्यांगांना कृत्रिम पायांचा लाभ मिळाला. तसेच पुनर्वसन केंद्राच्या विकासाबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनामुळे उपस्थित दिव्यांग आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

### बुटखेडा येथील...

राजेंद्र बनकर, ऋषी बनकर, स्वप्नील बदर, रामेश्वर बनकर, बाबासाहेब बनकर, दामोदर बनकर, पंढरीनाथ बनकर, सुधाकर चंदनशिव, पांडुरंग बनकर, विठ्ठल बनकर अनिल पवार, मदन साबळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

''जाफ्राबाद तालुक्यातील मौजे बुटखेडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या दोन वर्गखोल्यांचे गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीत मोठे नुकसान झाले होते. शाळा आवारातील निलगिरीचे झाड वर्गखोल्यांवर कोसळल्यामुळे छत व इमारतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या घटनेनंतर संबंधित बाबीची माहिती तहसीलदार तसेच गटशिक्षणाधिकारी यांना पत्राद्वारे देण्यात आली होती.त्यानंतर गटशिक्षणाधिकारी यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन पाहणी केली व वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला. त्यानुसार या दोन वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी सुमारे सात लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र, निधी मंजूर होऊनही अद्याप प्रत्यक्ष दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झालेली नाही.

शाळेची दुरुस्ती लवकरात लवकर सुरू व्हावी, यासाठी संबंधित यंत्रणेकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरणात शिक्षण मिळावे, ही आमची प्राथमिकता असून प्रशासनानेही या कामाला गती द्यावी, अशी अपेक्षा आहे.'

**गजानन मांटे**
**केंद्रप्रमुख डोनगाव**

४ एप्रिल २०२६ ला या कामाची प्रशासकीय मान्यता मिळाली असल्याची माहिती आहे. परंतु आतापर्यंत हे कामाची मान्यता ग्रामपंचायत ला आली नाही, आम्ही मुख्यअधिकारी यांच्याकडे गेलो होतो, लवकर हे काम सुरु नाही तर आम्ही जिल्हा परिषद समोर आमरण उपोषण करणार आहे

योगेश बनकर
ग्रामस्थ बूटखेडा

### गाव तेथे अभ्यासिका...

पुस्तकांची कोठारे नसून संस्कार केंद्रे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. टेंभुर्णीच्या सरपंच सुमनताई म्हस्के यांनीही या संकल्पनेला पाठिंबा दिला आहे. गावात ग्रंथालय असूनही जागेअभावी मुले तिथे बसू शकत नाहीत. जिल्हा परिषदेची अभ्यासिका ग्रंथालयाला जोडून दिल्यास एकाच छताखाली पुस्तके आणि बसायला जागा मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच घरात अभ्यासासाठी शांतता मिळत नसल्याने गावातच अभ्यासिका झाल्यास एमपीएससीची तयारी करणे सोपे जाईल, अशी प्रतिक्रिया दहावीतील विद्यार्थी आकाश राठोड याने दिली. _ चौकट :- गाव तेथे अभ्यासिका उपक्रम राबवल्यास प्रत्येक गावातील विद्यार्थी यांना वाचनाची आवड निर्माण होते. सद्यस्थितीमध्ये मोबाईलच्या जमान्यात विद्यार्थी वाचनापासून दूर जात असून, वाचनातून ज्ञान मिळवण्याची संकल्पना बाधित होत आहे. गाव तिथे अभ्यासिका संकल्पना राबवल्यास विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होईल आणि स्पर्धात्मक परीक्षेमध्ये विद्यार्थी पुढे जाण्यास तयार होईल -
--रावसाहेब अंभोरे, महात्मा फुले सार्वजनिक वाचनालय टेंभुर्णी

### एमजी मोटर्सला...

आहे. यामुळे इतरांनाही प्रेरणा मिळेल की त्यांनी आपल्या ग्राहक हक्कांसाठी पुढे यावे.''

हा निर्णय ऑटोमोबाइल उद्योगातील इतर कंपन्यांसाठीही एक इशारा आहे की, त्यांनी आपल्या उत्पादनांची गुणवत्ता आणि विक्रीपश्चात सेवा यावर अधिक लक्ष केंद्रित करावे. ग्राहकांना केवळ वाहन विकणे पुरेसे नाही, तर त्यांना वॉरंटी कालावधीत योग्य आणि वेळेवर सेवा प्रदान करणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

# दिलशाद एस. खान यांचा रॉयल अरब एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ ने गौरव




मुंबई : मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित रॉयल अरब एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ सोहळ्यात दैनिक मुंबई हलचलचे संपादक दिलशाद एस. खान आणि ॲडव्होकेट शाहबाज दिलशाद खान यांना त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. रॉयल अरब इव्हेंट्स यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या भव्य सोहळ्यात विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्तिमत्त्वे, उद्योजक, कलाकार, समाजसेवक आणि व्यावसायिकांना त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी गौरविण्यात आले.

या प्रतिष्ठित व्यासपीठाची स्थापना आंतरराष्ट्रीय बॉक्सर आणि रॉयल अरब इव्हेंट्सचे संस्थापक अमजद खान यांनी केली आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून समाजासाठी प्रेरणादायी ठरलेल्या व्यक्तींना सन्मानित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आशाराजे गायकवाड उपस्थित होत्या. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिक वाढली. यावेळी ज्येष्ठ बॉलिवूड अभिनेते रणजीत, अभिनेते अकबर खान, डॉ. जान निसार लोन, फारूक शेख, खालिद बाबू कुरेशी, राज सूरी, शैल पीरजादा, स्वराज कपूर, मीरा कपूर (उपाध्याय), महेंद्र काबरा, अभय सिन्हा, सुनील मेहरा तसेच डॉ. सर्गेई द्रोयानोव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्यात चल्ला प्रसाद, अजाइल शेख रहमान, अल्तमश खान, आर्किटेक्ट संजीव शर्मा, डॉ. अर्पित चोप्रा जैन, काझी तौकीर, राणी हजारिका, डॉ. उत्तम जाजू, सी. बी. रमण, शादाब फरीदी, विष्णू शर्मा, व्लादिमीर केड्रिन्स्की, शहजाद अली, अनस असगर खान, प्रदीप घुले, अलीशा जमील अहमद खान, मुदस्सर मोहम्मद आणि सरगम खान यांचाही गौरव करण्यात आला.

यावेळी अमजद खान यांनी सांगितले की, रॉयल अरब एक्सलन्स अवॉर्ड्सचे उद्दिष्ट उत्कृष्टता, नवोपक्रम आणि समाजात सकारात्मक बदल घडविणाऱ्या व्यक्तींना जागतिक स्तरावर सन्मानित करण्याचे आहे. विविध क्षेत्रांतील प्रतिभावंतांना एकत्र आणून त्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात प्रेरणादायी भाषणे, पुरस्कार वितरण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि नेटवर्किंग सत्रांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक करत या उपक्रमाला आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित सन्मान मंच असल्याचे गौरवोद्गार काढले.

**छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई**

## पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करावे - शिवसेना शहरप्रमुख विष्णूभाऊ पाचफुले



**जालना । प्रतिनिधी**

जुना जालना परिसरातील पाचफुले फार्म हाऊस येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमाचे नेतृत्व शिवसेनेचे शहरप्रमुख तथा माजी विरोधी पक्षनेते विष्णूभाऊ पाचफुले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना विष्णूभाऊ पाचफुले म्हणाले, ‘‘पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. केवळ वृक्षारोपण करून थांबून चालणार नाही, तर झाड जगविणे आणि त्याचे संवर्धन करणे हीदेखील आपली सामूहिक जबाबदारी आहे. हरित जालना घडविण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला, तर येणाऱ्या पिढ्यांना स्वच्छ आणि निरोगी पर्यावरणाचा लाभ मिळेल.

या उपक्रमातून पर्यावरण संरक्षणाचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. उपस्थितांनीही वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय सहभाग नोंदविण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी उद्धव भुतेकर गणेश भुतेकर आयुष राठोड पांडूशेठ खैरे साळवे मामा आदींची उपस्थिती होती

## मुख्यमंत्र्यांकडे चर्मकार समाजाच्या विविध मागण्यांसाठी अखिल भारतीय गुरु रविदास परिवर्तन सेनेचे निवेदन

### संत रोहिदास चर्म उद्योग आर्थिक विकास महामंडळाचे बजेट वाढविणे, कर्जमर्यादा वाढविणे व जामीनदाराची अट रद्द करण्याची प्रमुख मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय गुरु रविदास परिवर्तन सेनेच्या वतीने मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई येथे चर्मकार समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष देविलाल बिरसोंने यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले.

निवेदनात संत रोहिदास चर्म उद्योग आर्थिक विकास महामंडळाचे अर्थसंकल्पीय बजेट वाढविण्यात यावे, चर्मकार समाजातील लाभार्थ्यांना ₹५० लाखांपर्यंत कर्ज उपलब्ध करून द्यावे, तसेच महामंडळामार्फत दिल्या जाणाऱ्या कर्जासाठी असलेली जामीनदाराची अट रद्द करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

याशिवाय एनएसएफडीसी () अंतर्गत देण्यात येणाऱ्या कर्जाची मर्यादा वाढवून ₹२५ लाखांपर्यंत करण्यात यावी, सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या स्टॉल योजनेंतर्गत स्टॉलची संख्या वाढवून नोंदणी अर्ज वर्षभर स्वीकारण्यात यावेत, तसेच महामंडळाकडून मिळणारे ₹१० हजारांचे अनुदान वाढवून ₹२ लाख करण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली.

प्रत्येक जिल्ह्यात संत रोहिदास चर्म उद्योग आर्थिक विकास महामंडळामध्ये चर्मकार समाजाला प्राधान्य देऊन पदभरती करण्यात यावी तसेच प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र जिल्हा व्यवस्थापकाची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

या प्रसंगी संघटनेचे खुशाल भवरे, बाबूलाल शिंगरे, शिवलाल वडोदे, कैलास खरात, रतन ईरछे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

संघटनेच्या वतीने शासनाने चर्मकार समाजाच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन तातडीने अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# पावसाळयामध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी आवश्यक - डॉ.जयश्री भुसारे

**जालना - प्रतिनिधी**

दरवर्षी माहे जुन मध्ये पावसाळा सुरु होतो. यामध्ये प्रामुख्याने जलजन्य व किटकजन्य आजारांचे प्रमाण वाढते. त्यामुळे पावसाळयामध्ये साथीचे रोग उदभवतात तसेच उद्रेक होतात. पावसाळयामध्ये गॅस्ट्रो, अतिसार, हगवण, कॉलरा, विषमज्वर (टायफाईड), काविळ, हिवताप, डेंग्यु, चिकुनगुनिया, लेप्टोस्पायरोसीस, स्क्रब टायफस इ.आजारांच्या रुग्ण संख्येत वाढ होत असते. कारण पावसाळयामध्ये वातावरण जीवजंतु साठी पोषक असते. तसेच अस्थमा, ताप, सर्दी, खोकला, सांधेदुःखी, पचनाचे आजार, अम्लपित्त यासारख्ये आजारदेखील डोके वर काढू लागतात. जलजन्य व किटकजन्य आजारांमध्ये रुग्ण संख्या वाढ किंवा उद्रेक होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंमलात आणणे आवश्यक आहे. हे टाळण्यासाठी काय काळजी घ्याल ? पाणी गाळुन, उकळुन पिणे.




पालेभाज्या, फळे वापरतांना मिठाच्या पाण्यात स्वच्छ धुणे. रस्त्यावरील उघडयावरचे/शिळे अन्न पदार्थ खाऊ नये. तयार केलेले अन्न झाकुन ठेवणे.

मच्छर, माशी घरामध्ये येऊ नये म्हणुन खिडक्यांना जाळया बसविणे.

परिसर स्वच्छ ठेवणे, गटारी व साचलेले पाणी वाहते करणे. डासोत्पत्ती स्थाने नष्ठ करणे. (पाणी साठे आठवडयातुन एकदा स्वच्छ करणे, कोरडा दिवस पाळणे, भंगार साहित्य, जुने टायर, नारळ करंवटया, कुलर, फ्रिज, पाण्याच्या टाक्या मनीप्लंन्ट यामध्ये साठलेले पाणी स्वच्छ करावे.) हौदामध्ये गप्पी मासे सोडणे.

मच्छरदाणी, मच्छरप्रतिबंधक रिप्लेंन्टस (ओडोमास, मच्छर अगरबत्ती). आरोग्य कर्मचारी/आशा यांना सहकार्य करणे. जलजन्य अथवा किटकजन्य आजारांची लक्षणे आढळुन आल्यास त्वरीत रुग्णालयामध्ये जाऊन औषधोपचार घेणे. सर्व शासकिय रुग्णालयामध्ये मोफत औषधोपचार उपलब्ध आहे.

## जाफ्राबाद तालुक्याच्या प्रमुख रस्त्यासाठी २४० कोटींचा निधी मंजूर; आ. संतोष दानवे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

**टेंभुर्णी - दत्ता देशमुख**

भोकरदनजाफ्राबाद विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी महत्त्वाचा निर्णय घेत आशियाई विकास बँक सहाय्यित महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्प अंतर्गत रामा २२४ ते बरंजळा लोखंडे बरंजळा साबळे जवखेडा ठेंग जानेफळ पं बोरगाव (बु.) बोरी (खु.) बोरगाव (मठ) भारज (बु.) भारज (खु.) वरुड (बु.) कोनड (बु.) ते जिल्हा सरहद्द या प्रमुख मार्गाच्या सुधारणा व मजबुतीकरणासाठी २४० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या मंजुरीसाठी आमदार संतोष पाटील दानवे यांनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला.



या रस्त्यामुळे बरंजळा (साबळे), जवखेडा (ठेंग), माहोरा, बोरगाव (बु.), वरुड (बु.), भारज (बु.), चापनेर, धोंडखेडा, बेलोरा आदी गावांचा संपर्क अधिक सक्षम होणार आहे. शेतकऱ्यांना शेतीमाल बाजारपेठेत जलद पोहोचविणे, विद्यार्थ्यांचा शाळा-महाविद्यालयांचा प्रवास सुलभ करणे, रुग्णांना वेळेत आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे तसेच व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांचे दळणवळण अधिक सुरक्षित व गतिमान होण्यास या रस्त्याचा मोठा फायदा होणार आहे. या प्रकल्पासाठी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे आणि आमदार संतोष पाटील दानवे यांनी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करून अधिकाऱ्यांसोबत अनेक बैठका घेतल्या. मतदारसंघातील ग्रामीण भागात दर्जेदार रस्ते उभारणे आणि विकासाला गती देणे हेच आपले प्राधान्य असल्याचे आमदार दानवे यांनी सांगितले. या निधीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आमदार दानवे यांनी आभार मानले. या प्रकल्पामुळे भोकरदनजाफ्राबाद मतदारसंघातील ग्रामीण विकासाला नवी चालना मिळणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमधील दोषसिद्धीचे प्रमाण वाढवा-मुख्यमंत्री

**मुंबई - प्रतिनिधी**

अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अर्थात ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान भवन येथे अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंमलबजावणीसाठी गठीत राज्यस्तरीय दक्षता व संनियंत्रण समितीच्या बैठकीत दिले. या कायद्यासारख्या विशेष कायद्यामध्ये सरकारी वकिलांमार्फत दोषसिद्धी वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या कार्याचा उल्लेख त्यांच्या मूल्यमापनात करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. बैठकीस खासदार हेमंत सवरा यांच्यासह समितीमधील आमदार उपस्थित होते. भारतीय न्याय संहितेमध्ये कुठल्याही खटल्यात दोन वेळा तडजोड किंवा समायोजन करण्याची तरतूद असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातही या तरतुदींवर आधारित कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करावा. विशेष कायद्यांमध्ये दोन वेळा समायोजनाचीच तरतूद असावी. जेणेकरून अशा गुन्ह्यांमध्ये आरोपी सुटणार नाहीत.

# महाकर्जमुक्तीच्या पलीकडचा विचार

महाराष्ट्राच्या कृषी इतिहासात काही निर्णय हे केवळ प्रशासकीय निर्णय म्हणून नोंदले जात नाहीत, तर ते शासनाच्या व्यापक दृष्टिकोनाचे प्रतीक ठरतात. राज्य शासनाने नुकतीच जाहीर केलेली ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६’ ही अशाच प्रकारची योजना आहे. ही योजना केवळ कर्जमाफी देणारी योजना नसून शेतकऱ्याला आर्थिक स्थैर्य, नव्याने पतपुरवठा आणि शाश्वत शेतीच्या दिशेने नेणारा एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून पाहिली जात आहे.

२०१४ मध्ये राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषवल्यापासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शाश्वत शेतीचा पुरस्कार केला आहे. महाराष्ट्रातील शेती आजही मोठ्या प्रमाणावर निसर्गावर अवलंबून आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, महापूर, हवामानातील अनिश्चितता आणि उत्पादन खर्चातील वाढ या अनेक कारणांमुळे शेतकरी वारंवार आर्थिक संकटात सापडतो. अशा परिस्थितीत कर्ज हा शेतीचा अविभाज्य भाग बनतो. परंतु जेव्हा हे कर्ज परतफेडीच्या क्षमतेपलीकडे जाते, तेव्हा त्याचे रूप आर्थिक विवंचनेत बदलते. त्यामुळे शेतकऱ्याला दिलासा देण्यासाठी शासनाने यापूर्वीही विविध कर्जमुक्ती योजना राबवल्या होत्या. मात्र या वेळी शासनाने केवळ कर्जमुक्तीचा विचार न करता भविष्यात शेतकरी पुन्हा त्याच परिस्थितीत अडकणार नाही यासाठी व्यापक दृष्टीकोन स्वीकारला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव या योजनेला देण्यात आले आहे, यालाही विशेष महत्त्व आहे. लोककल्याणकारी शासन, जलसंधारण, सिंचन व्यवस्था, ग्रामीण विकास आणि रयतेच्या हिताचा सातत्याने विचार करणाऱ्या अहिल्यादेवींच्या कार्याचा आदर्श आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या योजनेला त्यांचे नाव देऊन शासनाने इतिहासातील लोकाभिमुख परंपरेला अभिवादन केले आहे.

या योजनेचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे तिची रचना. यापूर्वी अनेकदा असे होत असे की दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी




जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना कोणताही लाभ मिळत नसे. एखाद्या शेतकऱ्याचे कर्ज दोन लाख दहा हजार रुपये असले तरी तो संपूर्णपणे अपात्र ठरत असे. त्यामुळे अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहत होते. यावेळी शासनाने ही त्रुटी दूर केली आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती शासनाकडून मिळणार आहे. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना नव्याने कर्ज घेण्याचा आणि शेती उभी करण्याचा मार्ग खुला होणार आहे.

या योजनेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान. अनेकदा चर्चेत केवळ थकीत कर्जदार येतात; मात्र वेळेवर कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन मिळणे आवश्यक असते. ही बाब लक्षात घेऊन शासनाने पन्नास हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. आर्थिक शिस्त राखणाऱ्या आणि प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा मोठा दिलासा आहे.योजनेचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे एकवेळ समझोता योजना अर्थात वन टाइम सेटलमेंट (ओटीएस). अनेक शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याने ते संपूर्ण कर्जमुक्तीच्या चौकटीत बसत नव्हते. आता अशा शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे तातडीचा आर्थिक भार कमी होऊन त्यांना नियोजनबद्ध पद्धतीने कर्जमुक्तीचा लाभ घेता येणार आहे.

मात्र या योजनेचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे तिच्यामागील शासनाची व्यापक भूमिका. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील शासनाने ही बाब स्पष्टपणे मांडली आहे की, वारंवार कर्जमाफी देणे हे अंतिम समाधान नाही. शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात का अडकतो, त्याचे उत्पन्न स्थिर का राहत नाही आणि शेती आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम कशी होईल, याचा अभ्यास करण्यासाठी उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली होती. त्या समितीच्या शिफारशींमधून शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन सक्षमीकरणाचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

यामध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे तो शाश्वत शेतीचा. प्रत्येक शेतापर्यंत सिंचन सुविधा पोहोचणे, पाण्याचे सक्षम व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेती उत्पादन खर्च कमी करणे, योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि वेळेवर पतपुरवठा करणे या गोष्टींवर शासनाचा भर आहे. कर्जमुक्ती हा त्यातील एक भाग आहे; परंतु भविष्यात कर्जमाफीची गरजच भासू नये अशी परिस्थिती निर्माण करणे हा त्यामागचा मोठा उद्देश आहे.

राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असून जवळपास ३६ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना मानली जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करून शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा संदेश दिला आहे.

योजनेची अंमलबजावणीही पूर्णपणे ऑनलाइन आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार आहे. आधार प्रमाणीकरण, बँकांमधील माहितीची पडताळणी आणि तंत्रज्ञानाधारित प्रक्रिया यामुळे लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांमधील कर्जदारांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून साधारणता लाभार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. पात्र लाभार्थ्यांच्या तपशीलाचे संकलन बँकामार्फत केले जाणार आहे.

आज महाराष्ट्रातील शेतकरी केवळ आर्थिक मदतीची अपेक्षा करत नाही, तर स्थैर्य, विश्वास आणि विकासाची संधी शोधत आहे. ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६’ ही त्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ही योजना शेतकऱ्याच्या तातडीच्या आर्थिक अडचणी दूर करेलच; पण त्याचबरोबर सिंचन, पतपुरवठा, तांत्रिक सक्षमीकरण आणि शाश्वत शेतीच्या माध्यमातून भविष्यातील सक्षम कृषी व्यवस्थेची पायाभरणी करण्याचाही प्रयत्न करेल.

म्हणूनच या निर्णयाकडे केवळ कर्जमाफी म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. हा निर्णय शेतकऱ्याच्या आत्मविश्वासाचे पुनरुज्जीवन, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना आणि शेतीच्या शाश्वत विकासासाठी उचललेले एक धाडसी पाऊल म्हणून पाहिले पाहिजे. महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राला नवसंजीवनी देण्याची क्षमता या योजनेत आहे आणि म्हणूनच ही योजना महाकर्जमुक्तीच्या पलीकडे जाऊन शेतकरी सक्षमीकरणाची नवी दिशा ठरू शकते.

**प्रवीण टाके,**
**उपसंचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

# विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) योजनेचा जालना जिल्ह्यात थाटात शुभारंभ

## उटवद येथे जिल्हास्तरीय उद्घाटन व जनसंवाद संमेलन; जलसुरक्षा, ग्रामीण विकास आणि शाश्वत सार्वजनिक मालमत्ता निर्मितीवर भर

**जालना – प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील मौजे उटवद येथे आज विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अर्थात विकसित भारत जी–रामजी कायदा, २०२५ अंतर्गत जिल्हास्तरीय उद्घाटन सोहळा आणि जनसंवाद संमेलन उत्साहात पार पडले. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारीया यांच्या हस्ते योजनेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, महिला बचत गट, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ आणि रोजगार हमी योजनेवरील मजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी उपजिल्हाधिकारी (रोहयो) मनीषा दांडगे यांनी प्रस्तावना करताना पूर्वीच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा), २००५ आणि नव्या विकसित भारत जी–रामजी कायदा, २०२५ मधील महत्त्वाचे बदल स्पष्ट केले. त्यांनी १ जुलै २०२६ पासून देशभरात या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्याची माहिती देत, योजनेची उद्दिष्टे, वैशिष्ट्ये आणि ग्रामीण विकासासाठी असलेले महत्त्व उपस्थितांना सविस्तरपणे सांगितले.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी जलसुरक्षा, ग्रामीण पायाभूत सुविधा, आजीविका पायाभूत सुविधा आणि हवामान बदल या चार प्रमुख क्षेत्रांवर योजनेत विशेष भर देण्यात आल्याचे सांगितले. गावांच्या गरजेनुसार सर्वसमावेशक विकास आराखडा तयार करून लोकसहभागातून दर्जेदार, शाश्वत आणि कायमस्वरूपी सार्वजनिक मालमत्ता उभारणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी मित्तल पुढे म्हणाल्या की, प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्या समन्वयातून गावांचा सर्वांगीण विकास साधता येईल. एल निनोमुळे उद्भवणाऱ्या संभाव्य परिस्थितीचा विचार करून जलसंधारणाची अधिकाधिक कामे हाती घेणे आवश्यक आहे. यासाठी जालना जलकवच अभियान–२०२६ आणि विकसित भारत जी–रामजी योजनेच्या माध्यमातून पाणी अडवा, पाणी जिरवा या संकल्पनेला चालना देणारी कामे मोठ्या प्रमाणावर राबविण्याचे आवाहन त्यांनी केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारीया यांनी क्षेत्रीय स्तरावर कार्यरत कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. मनरेगा योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात जलसंधारण, पाणंद रस्ते आणि घरकुलांसारखी अनेक दर्जेदार कामे पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. नव्या योजनेअंतर्गतही कामांची गुणवत्ता, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी हक्क संरक्षण प्रतिज्ञेचे सामूहिक वाचन केले. त्यानंतर विकसित भारत जी–रामजी कायदा २०२५ अंतर्गत सार्वजनिक वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते करण्यात आला, तर जलतारा कामाचा शुभारंभ (पान २ वर)

## दिव्यांगांच्या सेवेसाठी प्रशासन कटिबद्ध; पुनर्वसन केंद्राच्या विकासाला गती – जिल्हाधिकारी आशिमा मित्तल



**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील गांधी चमन येथील महिला रुग्णालयाच्या पाठीमागे असलेल्या जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रात दिव्यांगांना कृत्रिम पायांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला जालन्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवून लाभार्थ्यांना कृत्रिम पायांचे वितरण केले. यावेळी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जालना व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डी. बी. सोनी, कार्यवाह राजू भालेराव, कोषाध्यक्ष स्नेहल मगरे, डॉ. मिताली पंडित, लेखापाल विजय देशपांडे, विजयश्री किंग रे, ज्ञानेश्वर अंभोरे, जिल्हा परिषद दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी बाळासाहेब खरात जिल्हा परिषद सहाय्यक दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्री. कापसे, लोकसेवा मंडळाचे रुग्णमित्र पी. जी. देशपांडे, वाय. पी. वाकोडकर, जिल्हाधिकारी कार्यालयातील पाखरे सर, सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे तसेच श्री. खडके आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमानंतर (पान २ वर)

# बुटखेडा येथील जि.प. शाळा धोकादायक अवस्थेत

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर; दुरुस्ती न झाल्यास ग्रामस्थांचा अमरण उपोषणाचा इशारा

**दत्ता देशमुख**

बुटखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत अत्यंत जीर्ण झाल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शाळेचे छत पूर्णपणे खराब झाले असून टिनपत्रे गंजून निकामी झाली आहेत. पावसाळ्यात वर्गखोल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी गळत असून अनेक ठिकाणी भिंतींना तडे गेले आहेत. काही भागातील भिंतींची पडझडही सुरू असल्याने शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे.



शाळेची ही अवस्था पाहून पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांनी आपल्या पाल्यांना शाळेत पाठविण्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. परिणामी, शाळेतील विद्यार्थी संख्येतही घट होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. शिक्षणासाठी सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असताना संबंधित विभागाकडून या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

शाळेची दुरुस्ती करण्यासाठी ग्रामस्थ, पालक, शाळा व्यवस्थापन आणि लोकप्रतिनिधींनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाकडे निवेदने दिली, पत्रव्यवहार केला तसेच प्रत्यक्ष भेटी घेऊन शाळेची पाहणी करण्याची विनंती केली. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर जागे होण्यापेक्षा प्रशासनाने तातडीने शाळेची दुरुस्ती करावी किंवा नवीन इमारतीस मंजुरी द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत लवकरात लवकर सकारात्मक निर्णय न घेतल्यास बुटखेडा गावातील ग्रामस्थ, पालक व शाळा व्यवस्थापनाच्या वतीने जिल्हा परिषद, जालना येथे अमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित हा प्रश्न असल्याने प्रशासनाने तातडीने दखल घेण्याची मागणी सर्व स्तरातून होत आहे. यावेळी मुख्याध्यापिका सांगळे मॅडम, ग्रामपंचायत सदस्य योगेश बनकर, दुर्योधन बदर, मच्छिंद्र पांडव, गायकवाड सर, शिकणे सर, राहुल बनकर, संदीप जाधव, नितेश जाधव (पान २ वर)

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथील दोन विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती करिता निवड



**दत्ता देशमुख**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळांमध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त शाळा, विविध उपक्रम राबवणारी शाळा तसेच सर्व शालेय स्पर्धा परीक्षा मध्ये विद्यार्थी पात्र असलेली शाळा म्हणजे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा केंद्र किर्ला तालुका मंठा जिल्हा जालना ही होय.मागील वर्षी झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेची निवड यादी कालच प्रसिद्ध झाली .या यादीमध्ये दुधा येथील इयत्ता आठवीच्या दोन विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती करिता निवड झालेली आहे यामध्ये सार्थक रामेश्वर खुळे व स्नेहल संजय जाधव या दोन विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती मिळणार आहे .या विद्यार्थ्याच्या यशा करिता तळमळीने मेहनत घेणारे शाळेचे मुख्याध्यापक श्री. विजय कांगणे सर ,श्री. निलेश पिसे सर व श्री पंजाब दांदडे सर व शाळेला सर्वतोपरी मदत करणारे दुधा येथील सर्व पालक यांचे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी माननीय श्री क्षीरसागर साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी सन्माननीय के.जी. राठोड सर, किर्ला केंद्राचे केंद्रप्रमुख श्री खरात सर तसेच शाळा व्यवस्थापन समिती दुधा ग्रामपंचायत कार्यालयात दुधा या सर्वांनी अभिनंदन केले.

# गाव तेथे अभ्यासिका: निर्णयाचे ग्रंथालय असोसिएशनकडून स्वागत

## *अभ्यासिकांचे संचालन सार्वजनिक ग्रंथालयांकडे देण्याची निवेदनाद्वारे मागणी; विद्यार्थ्यांना होणार थेट फायदा*

**दत्ता देशमुख**

जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गाव तेथे अभ्यासिका हा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाची दारे खुली केली आहेत. जालना जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय असोसिएशनच्या वतीने या निर्णयाचे स्वागत करण्यात आले असून, या अभ्यासिका सार्वजनिक ग्रंथालयांच्या ताब्यात दिल्यास त्याचा योग्य उपयोग होईल, अशी मागणी एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. ग्रंथालयांकडे अभ्यासिका का हवी? १ जिल्ह्यातील ४०० हून अधिक नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालयांना वाचक हाताळण्याचा २५ वर्षांचा अनुभव आहे.

प्रशिक्षित ग्रंथपाल आणि स्वयंसेवक उपलब्ध असल्याने नव्याने २ भरतीची गरज नाही.

३ प्रत्येक ग्रंथालयाकडे आधीच ५ ते १० हजार पुस्तके असल्याने नवीन खरेदीचा खर्च वाचेल. ग्रंथालये रोज नियमित उघडत असल्याने अभ्यासिका बंद पडण्याचा धोका नाही.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये एक स्वतंत्र आणि सुसज्ज अभ्यासिका सुरू केली जाणार आहे. यात स्पर्धा परीक्षा, शालेय अभ्यास व वाचनासाठी पुस्तके, बसण्याची व्यवस्था, वीज आणि इंटरनेट सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. गावातच अभ्यासाची शांत व पोषक जागा मिळाल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

जालना जिल्हा ग्रंथालय असोसिएशनचे अध्यक्ष डि बी देशपांडे यांनी निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा परिषदेचा हा निर्णय अतिशय स्तुत्य आणि काळाची गरज आहे. अभ्यासिकांचे संचालन व व्यवस्थापन सार्वजनिक ग्रंथालयांकडे दिल्यास त्यांचा वर्षानुवर्षांचा अनुभव, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि पुस्तकांची उपलब्धता याचा थेट फायदा विद्यार्थ्यांना होईल. ग्रंथालये ही केवळ (पान २ वर)

# जालना येथे तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना – प्रतिनिधी**

मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि.३० जुन २०२६ पासुन एक महीना कालावधीत तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वत:चा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योगाबाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे. या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे, कच्चामाल, साहीत्य ,कॅपीसिटी, जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना, खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, अनुदानाच्या योजना ,कृषी संलग्न योजना, राष्ट्रीय पशुधन योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था, भांडवल उभारणी, मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी कांतिकराव दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी, मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला, जालना. मो. ९४२३७३०९३२ येथे दि.३० जुन २०२६ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन कांतिकराव दांडगे, मिटकॉन, जालना यांनी केले आहे.


# विस्डम इंग्लिश स्कूलचा यशाचा झेंडा; आकिफ जिल्ह्यात अव्वल

**जालना –प्रतिनिधी**

अंजुमन इशाअत–ए–तालीम संचलित विस्डम इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयोजित इयत्ता आठवीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. या परीक्षेचा निकाल गुरुवारी जाहीर झाला. विद्यार्थी मोहम्मद आकिफ शेख वसीम याने जालना शहरी विभागात जालना जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.तसेच नूर फातिमा



इरफान हिने शहरात पाचवा क्रमांक मिळविला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मोहम्मद झुल्फेकारुद्दीन, सचिव मोहम्मद इफ्तेखारुद्दीन आणि मुख्याध्यापक शेख जमील यांनी



विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच शिक्षक आणि पालकांच्या परिश्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# एमजी मोटर्सला ग्राहक तक्रारीत धक्का: सदोष वाहनासाठी ग्राहकाला भरपाई देण्याचे आदेश

**जालना – प्रतिनिधी**

एका महत्त्वाच्या निर्णयात, ग्राहक तक्रार निवारण आयोगाने एमजी मोटर्स इंडिया प्रा. लि. ला सदोष वाहन विकल्याबद्दल आणि वॉरंटी अंतर्गत दुरुस्तीमध्ये सेवा कमतरता दर्शविल्याबद्दल एका ग्राहकाला भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात, अंशुल जिंदाल यांनी मोटर्सविरुद्ध त्यांच्या नवीन वाहनात वारंवार निर्माण होणाऱ्या तांत्रिक दोषांबद्दल तक्रार दाखल केली होती, ज्याची दुरुस्ती कंपनी वॉरंटी कालावधीतही योग्य प्रकारे करू शकली नाही.

अंशुल जिंदाल यांनी खरेदी केलेल्या एमजी हेक्टर गाडीमध्ये वारंवार गंभीर तांत्रिक बिघाड होत होते. गाडी खरेदी केल्यापासून काही महिन्यांतच इंजिनमध्ये आवाज येणे, गिअरबॉक्समध्ये समस्या येणे आणि इतर यांत्रिक दोष दिसून आले. त्यांनी वारंवार डीलरशिपकडे तक्रार केली आणि वॉरंटी अंतर्गत दुरुस्तीची मागणी केली, परंतु कंपनीला हे दोष कायमस्वरूपी दूर करण्यात यश आले नाही. यामुळे ग्राहकाला मानसिक त्रास आणि आर्थिक नुकसान सहन करावे लागले.

या प्रकरणी ग्राहक आयोगाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले. ग्राहकाने सादर केलेले पुरावे, ज्यात दुरुस्तीच्या पावत्या, तक्रारींचे तपशील आणि वाहनाच्या स्थितीबद्दलचे अहवाल यांचा समावेश होता, ते आयोगाने विचारात घेतले. आयोगाने नमूद केले की, कंपनीने वॉरंटी कालावधीतही वाहनातील उत्पादन दोष दूर करण्यात आणि ग्राहकाला योग्य सेवा पुरवण्यात अपयश दाखवले, जे सेवा कमतरता या श्रेणीत येते.

आयोगाने एमजी मोटर्स इंडिया प्रा. लि . ला ग्राहकाला नुकसानभरपाई म्हणून विशिष्ट रक्कम देण्याचे आदेश दिले, ज्यात वाहनाच्या दुरुस्तीसाठी आलेला खर्च, मानसिक त्रासापोटी भरपाई आणि खटल्याचा खर्च यांचा समावेश आहे. हा निर्णय ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि कंपन्यांना त्यांच्या उत्पादनांच्या गुणवत्तेबद्दल आणि सेवांबद्दल जबाबदार धरण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरतो.

या प्रकरणातून शिकण्यासारखा धडा म्हणजे, ग्राहकांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक असले पाहिजे आणि सदोष उत्पादने किंवा सेवांच्या बाबतीत आवाज उठवण्यासाठी पुढे आले पाहिजे. अधिवक्ता महेश एस. धन्नावत यांच्या मते, ‘‘हा निकाल ग्राहकांसाठी एक महत्त्वाचा विजय आहे. कंपन्यांनी आपल्या ग्राहकांना चांगल्या प्रतीची उत्पादने आणि सेवा पुरवणे बंधनकारक आहे. जर ग्राहकांना उत्पादनातील दोष किंवा सेवेतील कमतरतेमुळे त्रास होत असेल, तर त्यांनी ग्राहक मंचाकडे दाद मागण्यास अजिबात कचरू नये. या प्रकरणात, ग्राहकाने दाखवलेला संयम आणि कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्याची तयारी ही अनुकरणीय (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.